क्रमांक/उविअ/कात-२/भूसं/पेंधर/नोटीस/२०१९
उपविभागीय अधिकारी पनवेल उप विभाग
पनवेल दि. ५ / ०३ /२०१९

CIDCO JMD OFFICE
In No.: E-1594
Date.: 06/3/19

प्रति,

१. तहसिलदार पनवेल
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल
३. तलाठी सजा पेंधर
४. ग्रामसेवक पेंधर

विषयः- भूसंपादन रायगड
नवी मुंबई प्रकल्पासाठी (दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग-४ वर उडडाण पुल (ROB) बांधणेच्या प्रयोजनासाठी मौजे पेंधर, ता.पनवेल येथील जमिनीचे संपादन बाबत
भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या आणि पारदर्शकता हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम ११ (१) अन्वये अधिसुचना

संदर्भः- दि. १९/१२/२०१८, रोजी दैनिक रामप्रहर व दैनिक रत्नागिरी टाईम्स या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आलेली अधिसुचना .

Inward No.: 984
Date: 6-3-19

उपरोक्त विषयानूसार व संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यांत येते की, नवी मुंबई प्रकल्पासाठी (दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग-४ वर उडडाण पुल (ROB)) बांधणेच्या प्रयोजनासाठी मौजे पेंधर, ता.पनवेल येथील ग.नं. ९७ क्षेत्र ०-१६-९० हे.आर.व ९९ क्षेत्र ०-५०-६० हे.आर या जमिनी नवी मुंबई प्रकल्पासाठी (दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग-४ वर उडडाण पुल (ROB)) बांधणेच्या प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या आणि पारदर्शकता हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम ११ (१) अन्वये अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, गुरूवार ते बुधवार फेब्रुवारी १४-२०,२०१९/माघ २५-फाल्गुन १, शके १९४० मध्ये प्रसिध्दी करण्यांत आली होती. सदरची अधिसुचना आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यासाठी सोबत जोडलेली आहे. तरी सदरची अधिसुचना आपले नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयाकडे तात्काळ सादर करण्यांत यावा.

Ranale
उपविभागीय अधिकारी पनवेल
उपविभाग पनवेल

प्रतः- मा.जिल्हाधिकारी,रायगड-अलिबाग (भूसंपादन) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर
प्रतः- मा.सह.व्यवस्थापकीय संचालिका सिडको, सिडकोभवन नवी मुंबई

२/- भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या आणि पारदर्शकता हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम ११ (१) अन्वये अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, गुरूवार ते बुधवार फेब्रुवारी १४-२०,२०१९/माघ २५-फाल्गुन १, शके १९४० मध्ये प्रसिध्दी करण्यांत आली होती. सदरची अधिसुचना आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यासाठी सोबत जोडलेली आहे. तरी सदरची अधिसुचना आपले नोटीस बोर्डावर व वेबसाईडवर प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयाकडे तात्काळ सादर करण्यांत यावा.

RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ५, अंक ७] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १४-२०, २०१९/माघ २५-फाल्गुन १, शके १९४० [पृष्ठे ७६, किंमत : रुपये १४.००

## प्राधिकृत प्रकाशन

### शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### अधिसूचना

### जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी यांजकडून

### मनाई आदेश

क्रमांक उचिशा/पोल-२/म.आ./कडवई/११७/२०१९.– ज्याअर्थी, मौजे कडवई, ता. संगमेश्वर गावातील वादग्रस्त स्मशानभूमीबाबत इकडील आदेश क्रमांक उचिशा/पोल-२/म.आ./कडवई/५०८/२०१८, दिनांक १४ नोव्हेंबर २०१८ अन्वये दिनांक १४ नोव्हेंबर २०१८ ते दिनांक १२ जानेवारी २०१९ या कालावधीकरिता मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५ प्रमाणे मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, मा. पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांचेकडील जावक क्रमांक जिविशा/९२५/२०१९, दिनांक ८ जानेवारी २०१९ अन्वये कळविले आहे की, वादग्रस्त स्मशानभूमीचा वाद अद्यापही मिटलेला नसल्याने, वादग्रस्त जागेकरीता दिनांक १३ जानेवारी २०१९ रोजीपासून पुढे ६० दिवस, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५ प्रमाणे मनाई आदेश लागू करण्याची विनंती केली आहे.

त्याअर्थी, मी, अपर जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी प्रकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेता मौजे कडवई, ता. संगमेश्वर येथील श्री. नजीर जुवळे यांचे घरासमोरील नदीचे पात्रात शासकीय जागेत ज्या ठिकाणी अंत्यविधी केला जातो त्या वादग्रस्त जागेत मृतदेहांचे दहन करून, दफन करून किंवा अन्य तऱ्हेने त्यांची विल्हेवाट लावण्यास मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३५ प्रमाणे दिनांक १५ जानेवारी २०१९ ते दिनांक १५ मार्च २०१९ पर्यंत मनाई आदेश लागू करीत आहे. सबब कडवई येथील अधिकृत स्मशानभूमीपैकी वाणीवठार व कडवई बाजारपेठ येथील ग्रामस्थांनी " देण " येथील स नं. ५०२, हि. नं. १४, क्षेत्र ०.१६.० या जागेचा वापर प्रेतांचे अंत्यविधीसाठी करावा.

सदरहू आदेशाचे उल्लंघन केल्यास मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १५ जानेवारी २०१९ रोजी दिला.

**अमित शेडगे,**
अपर जिल्हादंडाधिकारी,
रत्नागिरी.



पहा पृष्ठ क्र० २६

## उप विभागीय अधिकारी, पनवेल उप विभाग, पनवेल यांजकडून

### अधिसूचना

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ./कात-५/भूसंपादन/पेंधर/५३५३/२०१८.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०), याच्या कलम ३च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.), याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त " सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमीसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा).

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धिपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे), यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी पनवेल, उप विभाग पनवेल, (जुना ठाणानाका) यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची—एक

**जमिनींचे वर्णन**

गाव पेंधर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.

| अनुक्रमांक | गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | ९७ | ०.१६.९० |
| २ | ९९ | ०.५०.६० |

अनुसूची–दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| **अधिसूचना :— प्रकल्पाचे नाव** | : | मौजे पेंधर, ता. पनवेल येथील नवी मुंबई प्रकल्पासाठी [ दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग-४ वर उड्डाण पुल (ROB) ]बांधणेच्या प्रयोजनासाठी. |
| **निर्गमित :— प्रकल्पकार्याचे वर्णन** | : | मौजे पेंधर, ता. पनवेल येथील नवी मुंबई कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्वे नं. ९७, क्षेत्र ०.१६.९० हे. आर. व सर्वे नं. ९९, क्षेत्र ०.५०.६०. हे. आर. जमीन मौजे-तळोजे (पाचनंद) येथील १२.५ टक्के योजनाक्षेत्र व मौजे-खारघर, ता. पनवेल येथील नोड ही क्षेत्रे जोडण्यासाठी दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर उड्डाण पुलाचे (ROB) बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे. |
| **करण्यापूर्वी :— समाजाला मिळणारे लाभ** | : | नवी मुंबई शहराचे औद्योगिक महत्त्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याचे प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे प्रवास जलद गतीने व सुखकर होण्यासाठी उड्डाण पुल बांधणे आवश्यक आहे.<br><br>*** येथे मजकूर भरावा (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा व इतर लाभासंबंधात) |

अनुसूची–तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** निरंक.

अनुसूची–चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश** : मौजे-पेंधर, ता. पनवेल येथे उड्डाण पुल बांधल्यास नवी मुंबई शहराची वाढ व विस्तार बघता नवी मुंबई प्रकल्पासाठी [दिवे पनवेल रेल्वेलाईन व राष्ट्रीय महामार्ग-४ वर उड्डाण पुल (ROB)] बांधणे आवश्यक आहे.

वर नमूद सर्वे क्रमांकाबाबत दिवाणी अपिल क्रमांक २४३/२०१३ न्यायप्रविष्ठ असून दिनांक २३ नोव्हेंबर २०१३ रोजी अंतरिम आदेश काढण्यांत आले आहेत. मालकी हक्क हा विषय सदर जमिनीबाबत न्यायप्रविष्ठ असल्याने कोणत्याही प्रकारची न्यायालयीन वाद विवाद उद्‌भवण्यासाठी भूसंपादन कायदा, २०१३ च्या तरतुदीस अधीन राहून जमिनी संपादन करणे प्रस्तावित करण्यात आले आहेत. ही जमीन संपादन करण्यामुळे केवळ एक खातेदार बाधीत होत आहे व खातेदार विस्तापित होत नाही. संपादित करावयाची जमीन पिकाखाली नाही. भारत सरकार (रेल्वे मंत्रालय) यांचा उपक्रम असलेले डेडीकेटेड फ्रेट कोरीडोर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचेकडून सिडको महामंडळास आलेल्या पत्र क्रमांक MUM/S/EN/CIDCO/19.v, dated 21st November 2018 प्रमाणे DFCC कोरीडोर वरील सर्व लेव्हल क्रॉसींग मार्च २०२० पर्यंत बंद करण्यात येणार आहेत. त्यामुळे Level Crossing II वरील उड्डाण पुलाचे बांधकाम युद्धपातळीवर पूर्ण करणेचे आहे. मौजे-पेंधर, ता. पनवेल तसेच सिडको अखत्यारीतील तळोजे-२ या क्षेत्राकरिता येण्या-जाण्याकरिता हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम, २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदीनुसार सामाजिक आधार निर्धारणाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही.

अनुसूची—पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील** : निरंक

---

**टीप.**—उक्त जमिनीच्या आराखड्याचे उप विभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

पनवेल,
दिनांक ३१ जानेवारी २०१९.

दत्तात्रय नवले,
उप विभागीय अधिकारी,
पनवेल उप विभाग, पनवेल.